**RNI No. MAHBIL /2009/35530**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ७, अंक ४(२)] शुक्रवार, मार्च १२, २०२१/फाल्गुन २१, शके १९४२ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.—** महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | **पृष्ठे** **१-२** |

दिनांक १० मार्च २०२१ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**भूपेन्द्र मु. गुरव,**
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०२१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १२ मार्च २०२१ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

२००१ चा महा. २७. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम, २००१ याच्या कलम ३ मधील, पोट-कलम (१) मध्ये,— २००१ चा महा. २७.

(क) "१ जानेवारी २००१ रोजी " या मजकुराऐवजी, "३१ डिसेंबर २०२० रोजी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) दुस-या परंतुकामधील, खंड (क) मध्ये, "१ जानेवारी २००१ नंतर," या मजकुराऐवजी, "३१ डिसेंबर २०२० नंतर," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.